बुधवार, ६ एप्रिल २०१६

तरुण भारत

# दोडामार्ग महाविद्यालयाच्या 'लोकवेद'ची दखल

## संकलित केलेल्या लोकगीताचे मुंबई विद्यापीठाकडून होणार रेकॉर्डिंग

अजय कांडर
कणकवली

हळबे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, दोडामार्गने याच भागातील मौखिक परंपरेतील संकलित केलेल्या लोकगीतांचा 'लोकवेद' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. 'लोकवेद' ग्रंथाची मुंबई विद्यापीठानेही दखल घेतली असून संकलित केलेल्या लोकगीतांचे विद्यापीठाच्या लोककला अकादमीतर्फे रेकॉर्डिंग करण्याची ग्वाहीही कुलगुरू डॉ. संजय देशमुख यांनी दिली आहे. विशेष म्हणजे मुंबई विद्यापीठात असा उपक्रम राबविणारे दोडामार्ग हे पहिले कॉलेज ठरले आहे.

नव्या संशोधनानुसार देशातील २२० बोलीभाषा नष्ट झाल्या असल्याचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. मात्र, भाषा जतन करायची असेल, तर आपल्या मौखिक परंपरेतील साहित्याचेही जतन व्हायला हवे. याच पार्श्वभूमीवर दोडामार्ग महाविद्यालयाने 'लोकवेद'चे केलेले संकलन आणि त्यानंतर केलेल्या संपादनाला महत्व प्राप्त होत आहे.

प्रत्येक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातील भाषेचे प्राध्यापक आपापल्या पातळीवर संशोधन करीत असतात. त्यासाठी यूजीसीकडून त्यांना भरीव अर्थसहयोगही प्राप्त होत असते. महाविद्यालय पातळीवर सामुदायिकरित्या असे काम उभे राहताना दिसत नाही. असे काम हळबे महाविद्यालयाने करताना त्यात विद्यार्थ्यांना प्राम्युख्याने सहभागी करून घेतले आहे. दोडामार्ग भागातील लोककला,




'लोकवेद'चे मुखपृष्ठ

परंपरा व लोक साहित्यावर आधारित लोकगीते विद्यार्थ्यांनी संकलित केली असून ती महाविद्यालयाच्या मराठी भाषा व वाङ्मय मंडळ आणि महिला विकास कक्षातर्फे प्रसिद्ध करण्यात आली आहेत. प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. दिलीप बर्वे, प्रा. सोपान जाधव, डॉ. राजेंद्र इंगळे यांनी ही लोकगीते 'लोकवेद' या नावे संपादित केली आहेत. दरम्यान, हा ग्रंथ दोडामार्ग तालुक्याच्या लोकगीत इतिहासाचा दस्तावेज ठरेल, असा विश्वास प्राचार्य डॉ. पाटील यांनी व्यक्त केला.

फुगडी, लग्न गीते, जात्यावरच्या ओव्या, डोणागीते, सणांची गीते, आट्यावरची गीते, शेतातील लावणी गीते, पारंपरिक गाऱ्हाणे, हुमाणी–कोडी, धनगरी आदी मौखिक गीतांचा 'लोकवेद'मध्ये समावेश केला आहे. त्यांची स्वतंत्र विभागणी करण्यात आली आहे. गोव्यातील लोकसाहित्याच्या अभ्यासक तथा गोवा सरकार, मराठी अकादमीच्या सदस्या पौर्णिमा केरकर यांची या ग्रंथाला प्रस्तावना लाभली असून त्या म्हणतात, दोडामार्गचा इतिहास व संस्कृतीचा अभ्यास करताना 'लोकवेद' हे प्रमुख साधन म्हणून संशोधक या ग्रंथाकडे पाहतील.

### जिल्ह्याच्या गॅझेटियरमध्ये होणार समावेश

शासनातर्फे प्रत्येक जिल्ह्याचे गॅझेटियर प्रसिद्ध होणार आहे. सिंधुदुर्गची जबाबदारी मुंबई विद्यापीठाचे इतिहास विभागातील प्रा. डॉ. किशोर गायकवाड यांच्याकडे आहे. या गॅझेटियरमध्ये 'लोकवेद'मधील संदर्भाचा समावेश करण्यात येणार आहे. दरम्यान, शासनामार्फतही महाराष्ट्रातील लोकगीतांचे संकलन करण्यात येणार असून तत्पूर्वीच दोडामार्ग महाविद्यालयाने अशा लोकगीतांचे संकलन करून ते प्रकाशितही केले आहे.

### कुलगुरूंकडून ऑडिओ रेकॉर्डिंगची ग्वाही

मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख यांनी महाविद्यालयाच्या या कामाबाबत प्रशंसोद्गार काढले असून त्यांनी विद्यापीठाच्या लोककला अकादमीतर्फे या लोकगीतांचे ऑडिओ रेकॉर्डिंग करण्यात येणार असल्याची ग्वाहीही दिली आहे.